**मंत्रीमंडळ निर्णय :** **दिनांक : ८ नोव्हेंबर, २००९**

मुंबई, दि. ८ :- आज झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले.

## जीवनावश्यक वस्तू डिसेंबर अखेरपर्यंत सवलतीच्या दरात देण्याचा निर्णय

नोव्हेंबर ते डिसेंबर २००९ या कालावधीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत सवलतीच्या दराने तूरडाळ, साखर व पामतेल या ३ वस्तूंचे लाभार्थ्यांस वितरण करण्याचा निर्णय झाला.

यासाठी ८८.०७ कोटी रुपये एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

तूरडाळीच्या लाभार्थ्यांची संख्या २ कोटी, पामतेलाचे लाभार्थी २ कोटी आणि साखरेचे लाभार्थी दीड कोटी एवढे आहेत. प्रतिमाह तूरडाळीची आवश्यकता १० हजार मेट्रिक टन, साखरेची आवश्यकता २८ हजार ८९८ मेट्रिक टन आणि पामतेलाची आवश्यकता १५ हजार एवढी आहे.

राज्य शासनाला तूरडाळ खरेदीसाठी प्रतिकिलो ७० रुपये, साखर ३२ रुपये आणि पामतेल ३२ रुपये ४७ पैसे लिटर एवढा खर्च येत आहे. ग्राहकांना शासनातर्फे तूरडाळ प्रतिकिलो ५५ रुपये, पामतेल ३० रुपये लिटर आणि साखर २० रुपये किलो या सवलतीच्या दराने देण्यात येईल.

सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येतील. बोगस शिधापत्रिकाधारकांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. साठेबाजांवर कडक कारवाई करण्याचे आदेश मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी दिले.

---------

## ९ नोव्हेंबर पासून विधानसभेचे आणि ११ नोव्हेंबर रोजी विधानपरिषदेचे अधिवेशन

९ नोव्हेंबरपासून विधानसभेचे तर ११ नोव्हेंबर रोजी विधान परिषदेचे अधिवेशन मुंबई येथे घेण्यासाठी राज्यपालांना शिफारस करण्यात आली.

या अधिवेशनासाठी कामकाजाची तात्पुरती दिनदर्शिका पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

९ आणि १० नोव्हेंबर रोजी **नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी होईल. ११ नोव्हेंबर रोजी विधानसभेच्या अध्यक्षांची निवडणूक व राज्यपालांचे संयुक्त बैठकीपुढे अभिभाषण होऊन अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात** येतील.

राज्यपालांच्या अभिभाषणावर पुढील अधिवेशनात चर्चा होईल.

----------

## कापूस खरेदीसाठी नाफेडची सब-एजंट म्हणून कापूस पणन महासंघाची नियुक्ती

केंद्र शासनाने कापूस खरेदीसाठी हंगाम २००९-२०१० मध्ये नाफेडची सब-एजंट म्हणून कापूस महासंघाची नियुक्ती केली आहे.

महासंघामार्फत २००८-०९ मध्ये राज्यात १६८ लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आली. हंगाम २००८-०९ ची कापूस प्रापण किंमत ४७१६ कोटी रुपये झाली. २००८-०९ मध्ये नाफेडबरोबर झालेल्या

कराराप्रमाणे हंगामातील कापूस खरेदी योजना यशस्वीरित्या पार पडलेली असली तरी देखील नाफेड आणि महासंघाला हंगामात उद्‌भवलेल्या समस्यांच्या आधारे करारामध्ये सुधारणा करणे अपरिहार्य झाले होते. व तशी सुधारणा करण्यात आली आहे.

हंगाम २००९-१० मध्ये शेतकऱ्यांना वेळेवर कापूस चुकारे अदा करण्याकरिता १०० कोटी रुपये मार्जिन व ५०० कोटी रुपयांसाठी बँकांकडून कर्ज घेण्यास शासन हमी मान्य करण्यात आली. त्याप्रमाणे महासंघामार्फत ५ नोव्हेंबर २००९ पासून कापूस खरेदीस प्रारंभ झाला आहे.

या वर्षीची नैसर्गिक परिस्थिती लक्षात घेता हंगाम २००९-१० मध्ये कापूस पेरा ३४.९५ लाख हेक्टर झाला आहे. राज्यात या हंगामात २७५ लाख क्विंटल अपेक्षित उत्पादन आहे. केंद्र शासनाने एफक्यू कापसाची आधारभूत किंमत गतवर्षी प्रमाणेच २५०० ते ३००० प्रतिक्विंटल अशी जाहीर केली असून यावर्षी कापूस खरेदीचे धोरण स्वीकारले आहे. अधिक लांबीच्या धाग्यासाठी कमीत कमी मायक्रोनियर व्हॅल्यू २.८ तसेच इतर कापसाच्या जातीसाठी मायक्रोनियर व्हॅल्यू ३.० राहील. त्यापेक्षा कमी किंमतीने कापूस खरेदी करता येणार नाही.

शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या कापसाचे आद्रतेचे प्रमाण हे ८ टक्के पेक्षा जास्त व १२ टक्केपेक्षा कमी असल्यास त्याप्रमाणात किंमत आकारली जाईल. निर्धारित केलेल्या १२ टक्क्यापेक्षा अधिक आद्रतेचा कापूस खरेदी करण्यात येणार नाही.

-----------

## २०१२ पर्यंत राज्य भारनियमन मुक्त करण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य

वीज हा या सरकारचा सर्वोच्च प्राधान्याचा विषय असल्याने ऊर्जा विभागाने वीज निर्मिती, वितरण या बाबींकडे काटेकोरपणे लक्ष पुरवावे असे आदेश मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी ऊर्जा विभागाला दिले आहेत. यासाठी उच्चाधिकार समिती स्थापन करून येणाऱ्या अडचणी व त्रुटी तात्काळ दूर कराव्यात व मंत्रिमंडळाला दर १५ दिवसानी याबाबत अवगत करावे अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी केली.

२०१२ पर्यंत राज्यातील भारनियमन टप्प्याटप्प्याने बंद करण्याचे नियोजन ऊर्जा विभागामार्फत करण्यात आले आहे.

महापारेषण कंपनीमार्फत २००९-१० ते २०११-१२ या काळात एकूण ९८ नवीन अतिउच्चदाब उपकेंद्र कार्यान्वित करण्यात येतील. यामुळे उपकेंद्रांमध्ये ४२ हजार ६७० एमव्हीए एवढी वाढ स्थापित क्षमतेत होण्याची अपेक्षा आहे. एकूण ८,२८९ सर्कीट कि.मी. अतिउच्चदाब वाहिन्या कार्यान्वित करण्यात येतील. या सर्व कामांवर ८७५० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. यापैकी ६०० कोटी राज्य शासनामार्फत भागभांडवलाच्या स्वरुपात उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

ग्राहकांना सुरळीत व पुरेशा दाबाने वीज पुरवठा व्हावा म्हणून ८९१८ कोटी रुपये एवढ्या खर्चाचा पायाभूत सुविधा आराखडा तयार करण्यात येत असून त्या अंतर्गत ५६५ उपकेंद्रे उभारणी, ७२३७० नवीन वितरण रोहित्रे, ५७,५४० कि.मी. उच्चदाबाची वीज वाहिनी उभारणी या कामांचा समावेश आहे.

गावठण फिडर सेपरेशन व पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमांसाठी महावितरण कंपनीमार्फत २००९-१० या वर्षात १८८२.७१ कोटी, २०१०-११ मध्ये २९८५ कोटी आणि २०११-१२ मध्ये २,७४१ कोटी असा एकूण ७,६०७ कोटी रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. २० टक्के रक्कम भागभांडवल म्हणून उपलब्ध करून देण्यात येणार असून १५२१ कोटी रुपये ३ वर्षात महावितरण कंपनीला उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

राज्यातील विजेची उच्चतम मागणी जवळपास १५००० मेगावॅट एवढी असून राज्यात सुमारे ४००० ते ४५०० मेगावॅट इतके भारनियमन मे २००९ पर्यंत करण्यात येत होते. मे २००९ पासून जादा विद्युत निर्मिती तसेच विविध स्त्रोतांद्वारे वीज खरेदी, गावठाण फिडर कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले. त्यामुळे भारनियमन सुमारे १५०० मेगावॅट इतके कमी करण्यात आले. वीज वितरण क्षेत्रात सध्या ४००० मेगावॅट इतकी तूट सन २०११-१२ पर्यंत उच्चत्तम मागणीच्या वेळी १९००० मेगावॅट इतकी अपेक्षित विजेची मागणी लक्षात घेता डिसेंबर २०१२ अखेर ९००० मेगावॅट इतकी विजची तूट राहू शकते. ही तूट भरून काढण्यासाठी महाजेनकोमार्फत **४४३० मेगावॅट,** अल्ट्रा मेगा पॉवर प्रोजेक्ट आणि एनटीपीसीद्वारे **१,८४९ मेगावॅट,** दाभोळ गॅसप्रकल्प **९१० मेगावॅट** आणि खाजगी क्षेत्रातून अल्प व दीर्घमुदतीच्या करारानुसार २१४० मेगावॅट खरेदी करून वीज उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

डिसेंबर २०१२ अखेर अपेक्षित ९००० मेगावॅटची तूट उपलब्ध होणारी वीज व गावठाण फिडर व पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमांतर्गत होणाऱ्या भार व्यवस्थापनामुळे भरून काढणे शक्य होईल.

----------